# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक १ जुलै, २०२६
## (दुपारी १२-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

**माजी सैनिक कल्याण मंत्री** : "महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : उप सभापतींची निवडणूक.**

**(१) श्री.अंबादास एकनाथराव दानवे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"**श्री.जगन्नाथ मोतीराम अभ्यंकर, वि.प.स.** यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे उप सभापती म्हणून निवड करण्यात यावी."
**श्री.अभिजीत गोविंदराव वंजारी, वि.प.स.** अनुमोदन देतील.

**(२) श्री.संजय विनायकराव खोडके, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"**श्री.सचिन मोहन अहिर, वि.प.स.** यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे उप सभापती म्हणून निवड करण्यात यावी."
**श्री.विक्रम वसंतराव काळे, वि.प.स.** अनुमोदन देतील.

**(३) श्री.प्रविण यशवंत दरेकर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" **श्री.सचिन मोहन अहिर, वि.प.स.** यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे उप सभापती म्हणून निवड करण्यात यावी."
**श्री.धैर्यशिल ज्ञानदेव कदम, वि.प.स.** अनुमोदन देतील.

**(४) डॉ.मनिषा श्यामसुंदर कायंदे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"**श्री.सचिन मोहन अहिर, वि.प.स.** यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे उप सभापती म्हणून निवड करण्यात यावी."
**श्री.रविंद्र सदानंद फाटक, वि.प.स.** अनुमोदन देतील.

**चार : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना – (असल्यास)**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

(१) **श्री.सुनिल शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३ वर उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) निवेदन करतील :-**

बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पात ना. म. जोशी मार्ग येथील वरळीच्या धर्तीवर एकास एक (one-to-one) पार्किंग उपलब्ध करून देण्याबाबत.

(२) **श्री.अरुण लाड, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ५ वर महसूल मंत्री निवेदन करतील :-**

कुंडल (ता.पलूस, जि.सांगली) येथे स्वातंत्र्यसैनिकाच्या नावावरील मालमत्ता हडपण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या भ्रष्टाचाराबाबत.

(३) **श्री.अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १ वर शालेय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

नवोदय विद्यालयाच्या कर्मचाऱ्यांना शासन सेवेत समायोजित करण्याबाबत.

**पाच : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **सर्वश्री विक्रम काळे, संजय खोडके, सतिश चव्हाण, सत्यजीत तांबे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरूळ येथे दिनांक १० जून, २०२६ रोजी एका शिक्षकाने केवळ चौकशी केली असता, वैजापूर पोलीस अधिकारी आणि त्यांच्यासोबत आलेल्या वाळूमाफियांच्या टोळीने त्यांना चारचाकी वाहनात कोंडून अमानुष मारहाण केल्यामुळे त्यांचा झालेला दुर्दैवी मृत्यू, वैजापूर पोलिसांनी कायदा, नियम पायदळी तुडवून, स्थानिक खुलताबाद पोलिसांना अंधारात ठेवत वाळूमाफियाच्या खाजगी स्कार्पिओ गाडीतून गुंडांना सोबत घेऊन हे बेकायदेशीर अमानुष कृत्य करणे, शिक्षकाच्या मृत्यूनंतर गुन्हा लपविण्यासाठी वैजापूर पोलिसांच्या पथकाने मध्यरात्री खुलताबाद पोलीस ठाण्यात धाव घेऊन 'बॅक डेट' डायरी नोंद करण्यासाठी तेथील ड्युटी अधिकाऱ्यांवर टाकलेला प्रचंड दबाव, पोलिसांनी रचलेल्या हृदयविकाराच्या खोट्या बनावामुळे व जाणीवपूर्वक लावलेल्या सौम्य कलमांमुळे मुख्य आरोपींना तात्काळ जामीन मंजूर होणे आणि या संपूर्ण प्रकरणी संशयास्पद भूमिका असणाऱ्या पोलिसांवर अद्याप कोणतीही कारवाई न झाल्यामुळे मृत शिक्षकाच्या नातेवाईकांमध्ये व संपूर्ण जिल्ह्यात पसलेला

तीव्र असंतोष व प्रचंड संताप, पोलीस अधिकाऱ्यांचे वाळूमाफियांशी असलेले आर्थिक व गुन्हेगारी संबंध तसेच त्यांना पेढे भरवतानाचे सोशल मीडियावर व्हायरल झालेले फोटो, परिणामी, जनतेत पसरलेले घबराटीचे व भितीचे वातावरण, या गंभीर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित सर्व दोषींवर कडक फौजदारी व निलंबनाची कारवाई करण्याची, फरार आरोपींना अटक करण्याची आणि पीडित कुटुंबाला न्याय देण्याची स्थानिक जनतेकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा तात्काळ करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नंदुरबार जिल्हा हा गुजरात राज्याच्या सीमेलगत अवघ्या १२ किलोमीटर अंतरावर असणे, पूर्वी गुजरात राज्यातून नंदुरबार जिल्ह्यात बांधकामासाठी येणाऱ्या वाळूस झिरो रॉयल्टीची सवलत लागू असल्यामुळे स्थानिक नागरिक, कंत्राटदार व शासकीय विकासकामांसाठी वाळू सहज उपलब्ध होत असणे, मात्र सद्यस्थितीत ही सवलत बंद असल्यामुळे जिल्ह्यात तीव्र वाळू टंचाई निर्माण होणे, तसेच शासन निर्णय क्रमांक गौखनि-१०/०१२५/प्र.क्र.०५/ख-१, दिनांक ०८ एप्रिल, २०२५ अन्वये परराज्यातून येणाऱ्या वाळूच्या निर्गती व संनियंत्रणाबाबत नव्याने निर्बंध लागू करून संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत झिरो रॉयल्टी पास देण्याची कार्यवाही निश्चित करण्यात आलेली असतानाही नंदुरबार जिल्ह्यात प्रत्यक्षात झिरो रॉयल्टी सवलत लागू न होणे, त्यामुळे वाळू वाहतुकीवर मर्यादा येऊन शासकीय व खासगी बांधकामांवर गंभीर परिणाम होणे, त्याचबरोबर वाळू वाहतुकीदरम्यान जिल्हाधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी व महसुल अधिकाऱ्यांकडून अनधिकृत वसुली होत असल्याच्या तक्रारी समोर येणे, परिणामी सर्वसामान्य नागरिक व कंत्राटदारांमध्ये तीव्र नाराजी निर्माण होणे, या पार्श्वभूमीवर नंदुरबार जिल्ह्यात पूर्वीप्रमाणे झिरो रॉयल्टी सवलत तात्काळ पुनर्स्थापित करून वाळू पुरवठा सुरळीत करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री. जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"वित्त विभागाच्या शासन निर्णय दिनांक ४ मे, २०२० अन्वये कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांवर बंदी लादली जाणे, सदर बंदी वित्त विभागाने शासन निर्णय दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ नुसार उठविणे व रिक्त जागा भरण्यास अनुमती देणे, शालेय शिक्षण विभागाने त्यानुसार शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीस परवानगी देणे, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्यावर शिक्षण संचालकांच्या

परिपत्रकाद्वारे मात्र पुन्हा बंदी लादली जाणे, अशा या बंदीमुळे शाळांमध्ये शिपाई, प्रयोगशाळा सहाय्यक, ग्रंथपाल, लिपीक इत्यादी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांअभावी अध्ययन-अध्यापना व्यतिरिक्तची सर्व कामे शिक्षकांना पार पाडावी लागणे, अल्पसंख्यांक संस्थामध्ये अतिरिक्त कर्मचारी सामावून घेण्याचे बंधन नसताना व नियुक्तीवर दिनांक १३ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयानुसार बंदी घालणे आवश्यक नसतानाही अल्पसंख्यांक संस्थांनाही शिक्षकेत्तरांच्या रिक्त जागा भरु दिल्या न जाणे, अशा प्रकारे एका तर्कहीन परिपत्रकांमुळे निर्माण झालेली शाळांची दुरावस्था, प्रशासकीय कार्यामध्ये तसेच विद्यार्थ्यांच्या शिक्षणामध्ये निर्माण झालेला अडथळा, त्यामुळे शिक्षक, मुख्याध्यापकांना होत असलेला मनस्ताप आणि याबाबत राज्य शासनाने केलेली अथवा करावयाची कार्यवाही."

(४) **डॉ. परिणय फुके, श्री. प्रविण दरेकर, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री. सदाशिव खोत, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नागपूर शहरातील अंबाझरी तलावाची पाणीपातळी अत्यंत खालावलेली असणे, आजूबाजूच्या परिसरातील प्रक्रिया न केलेले सांडपाणी थेट तलावात मिसळत असल्याने पाण्याचे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण झालेले असणे, या तलावातून हिंगणा एमआयडीसीला पाणीपुरवठा होत असून पाण्यातील ऑक्सिजन कमी होऊन बीओडी-सीओडीची पातळी धोक्याच्या बाहेर गेल्याने तसेच जलपर्णी वाढून पाण्याला दुर्गंधी सुटल्याने येथील उद्योगांसमोर संकट उभे राहणे, सध्याची १३.५ एमएलडी क्षमतेची जलशुद्धीकरण यंत्रणा कुचकामी ठरत असून वाढत्या सेंद्रिय प्रदूषणामुळे पारंपरिक ‘क्लोरीनीकरण’ पद्धती पूर्णपणे निष्प्रभ ठरत असणे, फिल्टर सिस्टम वारंवार चोक होत असणे, अति-क्लोरीनीकरणामुळे ‘ट्रायहालोमेथेन’ सारखी घातक रसायने तयार होण्याचा मोठा धोका वाढलेला असणे, या दूषित पाण्यामुळे कारखान्यांच्या पाइपलाईनमध्ये क्षार साचणे व यंत्रांना गंज लागणे, यामुळे देखभालीचा खर्च वाढून उद्योगांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत असून, विशेषतः थेट पाण्यावर अवलंबून असलेल्या औषध निर्मिती व अन्न प्रक्रिया उद्योगांना मोठा फटका बसत असणे, प्रदूषण नियंत्रण मंडळ केवळ नोटिसा देऊन बोळवण करत असून एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशनने महानगरपालिका व एमआयडीसीकडे वारंवार पाठपुरावा करूनही प्रत्यक्ष कारवाई शून्य असणे, तरी शासनाने या गंभीर बाबीची तात्काळ दखल घेऊन तलावात येणारे सांडपाणी व अतिक्रमण त्वरित थांबवणे, तलावाच्या संवर्धनासाठी ‘नॅनो बबल असिस्टंट ऑक्सिकरण’ सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कायमस्वरूपी तोडगा काढणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**सहा : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

**सात : शासकीय विधेयके —**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(१)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ - महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ - महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**(३)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ - महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ - महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

**आठ : म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

**श्री. प्रविण दरेकर,** डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री विक्रम काळे, प्रसाद लाड, हेमंत पाटील, शिवाजीराव गर्जे, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, पंकज भुजबळ, राजहंस सिंह, डॉ.मनिषा कायंदे, श्री. इद्रिस नायकवडी, डॉ. परिणय फुके, श्रीमती भावना गवळी, श्री. संजय खोडके, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री कृपाल तुमाने, अनिकेत तटकरे, अमित गोरखे, किशोर दराडे, झीशान सिद्दिकी, योगेश टिळेकर, चंद्रकांत रघुवंशी, विक्रम काकडे, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री रविंद्र फाटक, वसंत खंडेलवाल, दुष्यंत चतुर्वेदी, सदाशिव खोत, किरण सरनाईक, विक्रांत पाटील, गोकुळ गीते, अमरिशभाई पटेल, ज्ञानेश्वर म्हात्रे, सुनील कर्जतकर, श्रीमती माधवी नाईक, सर्वश्री प्रमोद जठार, विवेक कोल्हे, अरुण लखानी, डॉ. प्रज्ञा सातव, श्री. धर्मगुरू बाबूसिंग राठोड, डॉ. राजीव पोतदार, सर्वश्री संजय भेंडे, प्राजक्त तनपूरे, प्रविण पोटे-पाटील, राजेंद्र राऊत, अविनाश ब्राम्हणकर, नंदकिशोर महाजन, धैर्यशील कदम, अमरनाथ राजूरकर, बसवराज पाटील, सुहास शिरसाठ, **वि.प.स यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव – (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

"मागील दोन वर्षांच्या काळात मुंबईसह एमएमआरडीए व पीएमआरडीए भागात पर्यावरणपूरक व गतीमान दळणवळण आणि गृहनिर्माण, झोपडपट्टी निर्मूलन हे मुद्दे केंद्रबिंदू मानून व स्मार्टसिटीचे लक्ष डोळयासमोर ठेऊन स्थानिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी नियोजनात्मक व कालबध्द कामे हाती घेण्यात येणे, ही शहरे खड्डेमुक्त करण्याकरिता रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्याचा निर्णय घेण्यात येणे, मुंबईतील भेंडीबाजार, धारावी सारख्या गजबजलेल्या भागांचे पुनर्वसन करण्याकरिता एसबीयुटी सारखे गृहनिर्माण प्रकल्प नागरी पुनरुत्थान घडविणारे होणार असणे, स्वयं पुनर्विकासाच्या माध्यमातून गृहनिर्माण प्रकल्प अधिक गतीमान करण्यासाठी मुंबई जिल्हा बँकेकडून देण्यात येणाऱ्या कर्ज मर्यादेत वाढ करण्यात आली असणे, एमएमआरडीए क्षेत्रात सहकारी गृहनिर्माण संस्थाच्या पुनर्विकासासाठी मुंबई जिल्हा बँकेला नोडल एजन्सी म्हणून मान्यता देण्यात येणे, बीडीडी चाळीच्या पुनर्विकास प्रकल्पांना प्रोत्साहन मिळण्यासाठी पुनर्विकास करारनामा करणे, मुंबईतील पोलीस कर्मचाऱ्यांना पुरेशी निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यासाठी दीर्घकालीन, मध्यमकालीन व तात्काळ अशा तीन टप्प्यांवर पुनर्विकास करण्याचा निर्णय घेण्यात येणे, पुण्यातील सहकारी गृहनिर्माण सोसायट्या व गृहनिर्माण मंडळाच्या वसाहतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन पुनर्विकास करण्याची आवश्यकता, पीएमआरडीएच्या माध्यमातून पुणे शहरातील डीपी प्लॅन व रिंग रोड नव्याने तयार करण्याची आवश्यकता, मुंबईकरांना तात्काळ आरोग्य सुविधा मिळण्याकरिता मुंबईत मोबाईल मेडिकल युनिट सुरु करण्यात आले असणे, मुंबई, एमएमआरडीए व पीएमआरडीए, नागपूर, छत्रपती संभाजीनगर इत्यादी मोठया शहरांचा मेगापॉलिस मेटाव्हर्स प्रकल्पाच्या मदतीने अत्याधुनिक

तंत्रज्ञानाचा वापर करुन अधिक गतीमान विकास करण्याचा व ही शहरे झोपडीमुक्त करण्याच्या दृष्टीने शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

**नऊ : अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी)**

(१) **श्री. कृपाल तुमाने, डॉ. (श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वीज देयकात बचत करण्यासाठी सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे धोरण शासनाने माहे एप्रिल, २०२५ मध्ये जाहीर केलेले असणे, ऊर्जा वापरावर होणाऱ्या खर्चात सदर योजनेमुळे दीर्घकालीन आर्थिक बचत होऊन स्थानिक स्वराज्य संस्थांना दिलासा मिळणार असणे, तथापि सदर प्रकल्प राबविताना स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वतःचा आर्थिक हिस्सा उभारावा लागून प्रकल्पांसाठी प्रारंभी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करावा लागणे, त्याकरिता राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल नगरपरिषद/ नगरपंचायतींना शासनाकडून विशेष आर्थिक पॅकेज किंवा वाढीव अनुदान अथवा सौर ऊर्जा प्रकल्प राबविताना खाजगी भागीदारी मॉडेलचा अवलंब करण्याबाबतत शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

(२) **सर्वश्री विक्रम काळे, सतिश चव्हाण, शिवाजीराव गर्जे, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

" गंगापूर - लातूर मार्गावरील शिवना नदीवरील पुलाचे बांधकाम तातडीने पूर्ण करणे गरजेचे असून सदर मार्गावरुन दररोज शेकडो वाहनांची वाहतूक होत असल्याने स्थानिक ग्रामस्थांनी शिवना नदीवरील पुलाचे बांधकाम त्वरीत पूर्ण करण्याची मागणी केलेली असणे, प्रशासनाने ठेकेदारास माहे मे, २०२६ पर्यंत सदर पुलाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत निर्देश दिले असून त्यानुषंगाने गंगापूर येथील शिवना नदीवरील पुलाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ३० जून, २०२६.

**डॉ. विलास आठवले,**
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.